**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्रमांक १ याची जबानी सत्यप्रतिज्ञेवर सुरु.</u>**

मोटार अपघात नुकसान भरपाई
अर्ज क्र.१०३/२०२१
जुना M.A.C.P. क्र.१२६/२०१६
आश्वीनी –वि.– राजु
<u>निशाणी क्र.२६ खाली</u>

**<u>पुढील सरतपास– अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. एच.एम.रावळ यांचेमार्फत शपथेवर सुरु...</u>**

६. शपथपत्र माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आलेले असुन त्यामधील मजकुर बरोबर आहे. त्यावर मी सही केली आहे. ए.ए.फॉर्म **नि.क्र.२७** वर आहे. एफ.आय.आर.ची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२८</u>** वर आहे. घटनास्थळ पंचनाम्याची प्रमाणीत प्रत **<u>निशाणी क्र.२९</u>** वर आहे. इन्क्वेस्ट पंचनामा **नि.क्र.३०** वर आहे. पोस्ट मॉर्टम रिपोर्ट प्रमाणीत प्रत **नि.क्र. ३१** वर आहे. दोषारोपपत्राची प्रमाणीत प्रत (एकुण ११ पाने) **नि.क्र.३२** वर आहे. (गैरअर्जदार क्र.२ तर्फे हरकत घेण्यात आली की, दोषी वाहनाचा चालक या प्रकरणामध्ये बदलण्यात आला असा बचाव असल्याने दोषारोपपत्रास पुराव्यात सामील करण्यात येवू नये. परंतु प्रकरणाचे स्वरुप आणि दोषारोपपत्राची प्रमाणीत प्रत असल्याने त्यास नि.क्र.देण्यात आला) दोषी वाहन क्र.एम.एच.०६ एक्यु ५५१५ च्या नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत (एकुण ४ पाने) **<u>निशाणी क्र.३३</u>** वर आहे. दोषी वाहनाचा चालक किरण तायडे च्या वाहन चालविण्याच्या परवानाची सत्यप्रत **<u>निशाणी क्र.३४</u>** वर आहे. मोटर वाहन अपघातासंदर्भातील इन्शुरन्स कव्हर नोटची सत्यप्रत **<u>निशाणी क्र.३५</u>** वर आहे. दोषी वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेटची सत्यप्रत **नि.क्र.३६** वर आहे. अर्जदार क्र.२ चे जन्म प्रमाणपत्र **नि.क्र.३७** वर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>गैरअर्जदार क्र.१ तर्फे एकतर्फी असल्याने उलटतपास नाही.</u>**

**<u>उलटतपास– गैरअर्जदार क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री. बी.बी.पांडे यांचेमार्फत सुरु...</u>**

७. हे म्हणणे खरे आहे की पोलीस ठाण्यात मी स्वत रिपोर्ट दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात स्थळी मी स्वतः नव्हते त्यामुळे दोषी वाहन व त्याचा चालक कोण होता याविषयी मी सांगु शकत नाही. अपघात कसा घडला व कोणाची चुक होती हे मी सांगु शकत नाही. घटनेची फिर्याद अमोल तायडे यांनी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, अमोल हा अपघातच्या वेळी घरी होता व फोनवरुन त्याला अपघाताची माहिती मिळाली. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्यालाही अपघात कसा घडला व काय झाले याची माहिती नव्हती. घटनास्थळ मी स्वतः पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.२९ वरील पंचनाम्यात वाहन क्र.एम.एच.०६ ए.क्यु.५५१५ चा उल्लेख नाही. हे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्यावर नेमके घटनास्थळ कुठे आहे हे दर्शविलेले नाही.

८ हे खरे आहे की, घटना घडली तेव्हा माझे पती मोटरसायकल चालवत होते. माझे शिक्षण पदवीपर्यंत झाले आहे. हे खरे आहे की, नि.क्र.३१ वरील पोस्टमॉर्टम रिपोर्ट मध्ये मृत्यूचे कारण मेंदूला मार लागला असे देण्यात आले आहे. हे खरे आहे की, त्याव्यतिरिक्त त्यांना इतर कोठेही मार लागला नव्हता. हे खरे आहे की, मेंदुला मार लागला नसता तर माझ्या पतीचा मृत्यू झाला नसता. रात्री ८ ते ८.३० वाजेदरम्यानची घटना आहे. हे खरे नाही की, अपघाताच्या वेळी माझ्या पतीने हेलमेट घातले नव्हते. हे खरे आहे की, नि.क्र.२९ वरील पंचनाम्यामध्ये हेलमेटचा उल्लेख नाही. साक्षीदार स्वतहुन सांगतात की, त्यांनी हेलमेट डोक्यावर घातले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

९ हे खरे नाही की, माझ्या पतीकडे दुचाकी चालवण्याचा परवाना नव्हता म्हणुन तो दाखल करण्यात आला नाही. हे खरे नाही की, या अपघातास माझ्या पतीची सर्वस्वी जबाबदारी होती. हे खरे नाही की, या अपघातामध्ये इतर कोणत्याही वाहनाचा दोष नव्हता. हे खरे नाही की, पोलीसांनी कोणतीही चौकशी न करता किरण तायडे

विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. हे खरे नाही की, किरण तायडे हा घटनेच्या वेळी वाहन चालवत नव्हता. हे खरे नाही की, जो अपघातग्रस्त वाहनाचा चालक होता त्याच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना नसल्याने किरण तायडे यास पोलीसांनी या अपघातामध्ये सामील केले. हे खरे नाही की, अपघातग्रस्त वाहनाचा फिटनेस सर्टिफिकेट, परमीट आणि पी.यु.सी.नव्हते. हे खरे नाही की, इंशुरन्स पॉलीसीचा भंग केला असल्याने गैरअर्जदार नं.२ ची नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी येत नाही.

१० लग्न झाल्यानंतर मी पतीसोबत राहत होते. हे खरे आहे की, माझे सासु–सासरे हे माझ्या दिरासोबत वेगळे राहत होते. हे खरे आहे की, सासरे आणि दिराकडे थोडीफार शेती आहे. हे खरे आहे की, ते स्वतःचा अन्नपाणी, व्यवसाय करतात. हे खरे आहे की, अर्जदार क्र.३ ते ५ हे आमच्या पासुन वेगळे राहत होते.

११ हे खरे आहे की, माझ्या पतीच्या शिक्षणासंदर्भात कोणतेही कागदपत्र दाखल नाही. हे खरे नाही की, माझे पती पॅरॅगॉन कंपनीत काम करत होते आणि दरमहा १७२००/– एवढा पगार होता हे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, माझ्या पतीचे वय मृत्यूवेळी २९ वर्ष होते हे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, जास्त रक्कम मिळावी यासाठी खोटे शपथपत्र देवून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.08.17 16:13:58 +0530

दिनांक : १७/०८/२०२२

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.

वाचुन दाखवले बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत नोंदविण्यात आला.)

SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2022.08.17 16:14:05 +0530

दिनांक : १७/०८/२०२२

**(एस.व्ही.जाधव)**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा
सदस्य मोटार वाहन अपघात प्राधीकरण
मलकापूर.